admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com | दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

संकेतस्थळ : www.mcaer.org | फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१४१८/१८८७ | दि.१६ ऑगस्ट,२०१८

## प रि प त्र क

विषयः- व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांमधील संस्थास्तरीय कोटयातील प्रवेशासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्याच्या संकेतस्थळावर जाहिरात देण्यासाठी कार्यपध्दती.

संदर्भः- या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१४१८/१४५२, दि.२५/६/२०१८

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी), बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान), बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) आणि बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहे. या कार्यालयाच्या संदर्भीय परिपत्रकान्वये सदर अभ्यासक्रमाच्या कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांमधील संस्थास्तरीय कोटयातील प्रवेशाची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. यामधील मुद्दा क्र. (३) येथे 'प्रत्येक महाविद्यालय प्रवेशाचे वेळापत्रक आणि महाविद्यालयाकडून भरावयाच्या एकूण जागांची संख्या यांची जाहिरात महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर आणि सक्षम प्राधिकारी यांच्या संकेतस्थळावर त्यांनी निश्चित केलेले शुल्क भरून अधिसूचित करतील व प्रवेश अर्ज मागवतील.' असे नमूद करण्यात आलेले आहे.

यासंदर्भात राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून प्राप्त सूचनानुसार सक्षम प्राधिकारी यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीसंदर्भात खालील कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे.

१. जाहिरात 'ए-४' आकाराची (A-4 size) असावी व पीडीएफ स्वरूपात (PDF Format) असावी.

२. संस्थेकडे एकापेक्षा जास्त महाविद्यालये असल्यास व एकपेक्षा जास्त महाविद्यालयांची जाहिरात द्यावयाची असल्यास, प्रत्येक महाविद्यालयासाठी स्वतंत्र जाहिरात द्यावी. एकापेक्षा जास्त महाविद्यालयांसाठी एकच जाहिरात अनुज्ञेय नाही.

३. यासाठी शुल्क रु.५०००/- प्रती जाहिरात असे निश्चित करण्यात आलेले आहे.

४. विना अनुदानित महाविद्यालयांनी जाहिरात शुल्क जमा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| बँक खाते नावः | State CET CELL (Agri) M.S.Mumbai |
| शाखेचे नाव : | Mumbai Main Branch |
| शाखेचा सांकेतांक क्रमांक : | 00300 |
| बँक खाते क्रमांक : | 37718391008 |
| बँक IFSC सांकेतांक क्रमांक : | SBIN0000300 |

५. प्रथमतः महाविद्यालय / संस्थांनी, जाहिरात शुल्क वरील खात्यावर जमा करावे व शुल्क जमा केल्याच्या पावतीची स्कॅन प्रत व जाहिरात, edn_mcaer@rediffmail.com या ई-मेलवर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीत पाठवावी. जाहिरात प्राप्त झाल्यानंतर व शुल्क जमा झाल्याची खातरजमा केल्यानंतर सदरची जाहिरात www.mahacet.org तसेच www.maha-agriadmission.in ह्या संकेतस्थळांवर प्रसिध्दीस देण्यात येईल.

यास्तव या परिपत्रकाद्वारे असे सूचित करण्यात येते की, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत बी.एससी. (ऑनर्स) (कृषी), बी.एससी. (ऑनर्स) (उद्यानविद्या), बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी), बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान) आणि बी. टेक. (जैवतंत्रज्ञान) या व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांची जी महाविद्यालये / संस्था, सक्षम प्राधिकारी यांच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करू इच्छितात, त्यांनी वरील कार्यपध्दतीचा अवलंब करून सक्षम प्राधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दीची प्रक्रिया करावी.

कौसडीकर.
(डॉ. हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

प्रति :-
१. मे. जे. डीन. सॉफ्ट, सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.

वरील दोनही संस्थांना सूचित करण्यात येते की, संबंधित संस्था / महाविद्यालय यांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.

प्रतः- मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१.